NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर-४१३२५५ महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१-७३ (११ लाईन्स) फॅक्स-०२१७-२३५१३००
संकेतस्थळ :http://su.digitaluniversity.acई-मेल:fao@sus.ac.in




**खरेदी व भांडार विभाग**

जा.क्र.पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२३/ 1202 — दिनांक 21 OCT 2023

## -: दुसरी मुदतवाढ :-

प्रति

----------------

----------------

**विषय: प्रस्तुत विद्यापीठातील शास्त्रीय उपकरण केंद्र, रसायनशास्त्र संकुल व पदार्थविज्ञान संकुलामधील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिके व संशोधनाकरिता लागणारा गॅस वार्षिक दरकरारामधून खरेदी करणेच्या दरपत्रकास दुसरी मुदतवाढ देण्याबाबत..**

**संदर्भ :- १) दरपत्रक सुचना:जा.क्रं. पुअहो/सोविसो/विवले/खभांवि/२०२३/११६९, दि.०६/१०/२०२३**
**२) दरपत्रक सुचना:जा.क्रं. पुअहो/सोविसो/विवले/खभांवि/२०२३/११८५, दि.१३/१०/२०२३**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या नमूद विषयांकित कामाकरिता संदर्भ क्र. १ व २. नुसार कालावधीत दरपत्रके मागविण्याची प्रक्रिया करण्यात आली होती. विहीत कालावधीत अपेक्षित दरपत्रके प्राप्त न झाल्याने यास दुसरी मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी आपले अपेक्षित दर GST करासह दरपत्रक भरून **मा.वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर** यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात विहीत मुदतीत पाठवावे. दरपत्रकासंदर्भात सविस्तर माहिती व सुचना सोबत जोडल्या आहेत.

वरील कामाचे दरपत्रक, सुचना सोलापूर विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac व http://sus.ac.in या संकेतस्थळावर **Quotation** या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.

**-: मुदतवाढ तपशील :-**

| अ.क्र | तपशिल | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | मुदतवाढ प्रकाशित करण्याचा दिनांक | २१/१०/२०२३ | | वित्त व लेखा विभाग पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-४१३२५५ |
| २ | मुदतवाढ स्विकारण्याची सुरवातीचा दिनांक | २१/१०/२०२३ | | |
| ३ | दरपत्रके सादर करणे अंतिम दिनांक व वेळ | ३०/१०/२०२३ | सायं ०६.००वा | |
| ४ | दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | ३१/१०/२०२३ | सायं ०३.०० वा | |

(सीए. श्रेणिक शाह)
**वित्त व लेखा अधिकारी**

## सुचना व अटी

१. दरपत्रक हे सिलबंद पाकिटातून कार्यालयीन वेळेत मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग केगांव, सोलापूर-४१३ २५५ यांच्या नावाने विहित मुदतीत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत.

२. पाकीटावरती **प्रस्तुत विद्यापीठातील शास्त्रीय उपकरण केंद्र, रसायनशास्त्र संकुल व पदार्थविज्ञान संकुलांमधील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिके व संशोधनाकरीता लागणारे गॅस खरेदी करण्याकरिता दरपत्रके** असा स्पष्ट उल्लेख करावा.

३. **विविध संकुलाच्या दैनंदिन प्रात्यक्षिके व संशोधन कामासाठी आवश्यक गॅस खरेदीसाठी दरकरार हा एक वर्षाच्या कालावधीसाठी राहील.**

४. दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीत १. तांत्रिक २. दराची अशी सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक दरपत्रकासोबत शॉप ॲक्ट लायसन्स, पॅन कार्ड, GST Registration, यांच्या छायांकित (Self Attested) प्रती जोडणे बंधनकारक राहील.

५. दराच्या लिफाफ्यामध्ये SCHEDULE-B मधील Specification प्रमाणे दर भरुन जोडणे बंधनकारक राहील.

६. दैनंदिन प्रात्यक्षिके/संशोधनासाठी आवश्यक असणारे गॅस चा पुरवठा विद्यापीठ कार्यालयास दिलेल्या मुदतीत स्वखर्चाने करावा लागेल, त्यापोटी पुरवठादारास कोणत्याही प्रकारची ॲडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही.

७. दरपत्रकामधील दराच्या निविदेमध्ये ज्या फर्मने यादीतील कंपनी साहित्याचे (GAS) दरामध्ये न्युनतम दर L-१ दिलेली असतील त्याचे दर मंजुर करण्यात येतील. मंजुर झालेल्या दरात कोणत्याही कारणास्तव कोणताही बदल अथवा दरात वाढ करून मिळणार नाही. मान्य झालेल्या दराने करार कालावधीत आवश्यक असलेल्या साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

८. दिलेल्या मुदतीनंतर म्हणजेच उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी न केलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

९. दरपत्रक देताना आपले दर स्वंतत्र जी.एस.टी (GST) ची रक्कम नमूद करुन देण्यात यावीत. सदर पुरवठा/साहित्य हे विद्यापीठात आवश्यकते प्रमाणे स्वःखर्चाने पुरवठा करणे व सेवा देणे बंधनकारक राहील.

१०. पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून दहा दिवसाच्या आत साहित्याचा पुरवठा विद्यापीठामध्ये पोहोच करणे बंधनकारक राहिल.

११. कोणतेही कारण न देता दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे याबाबत विद्यापीठाने अधिकार राखून ठेवलेले आहेत. तसेच पुरवठा आदेशानुसार साहित्य नसेल तर पुरवठादाराचा ठेका रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

१२. ज्या न्युनतम पुरवठादाराचे दरपत्रक मान्य होईल त्या पुरवठादाराने सुरक्षा रक्कम रू.१६,०००/- विद्यापठाकडे ५ दिवसात रोखीने जमा करावी. सुरक्षा रक्कम २% रू. १६,०००/- जमा झ ाल्यानंतरच कराराची कार्यवाही करून पुरवठा आदेश देण्यात येईल. उर्वरित ३ % सुरक्षा ठेव प्रत्येक देयकामधुन कपात करण्यात येईल. सुरक्षा ठेवची रक्कम कराराचा कालावधी संपल्यानंतर पुरवठादाराच्या मागणीनुसार परत करण्यात येईल. वेळेत सुरक्षा ठेव न जमा केल्यास संबंधीत पुरवठादारा विरूध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३. ऑर्डरप्रमाणे सुस्थितीत साहित्य मिळाल्यापासून शक्यतो ३० दिवसापर्यंत खरेदी देयक धनादेशाने / ऑनलाईन पध्दतीने आवश्यक त्या कराची कपात करून अदा केले जाईल.

१४. पुरवठा आदेश देऊनही वेळेत साहित्याचा पुरवठा न केल्यास बाहेरून बाजारातुन सदर साहित्याची खरेदी बाजारभावाने करण्यात येईल व दरकरारापेक्षा जास्त आदा केलेली रक्कम सुरक्षा ठेव मधून वसुल करण्यात येईल.

१५. ऑर्डर प्रमाणे प्राप्त झालेले साहित्य खराब अवस्थेत प्राप्त झाले असेल तर सदर साहित्य बदलून स्वःखर्चाने देण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१६. खरेदी नग संख्या कमी अथवा जास्त करण्याचा तसेच करार रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

१७. दरकरार अथवा खरेदीमध्ये काही वाद निर्माण झाल्यास मा.कुलगुरू यांना याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राहतील.

**१८. पात्र पुरवठादारांना उपरोक्त सुचना व अटी मान्य असतील त्यांनी रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.**

१९. सदर साहित्य खरेदीचा वार्षिक दरकरार हा सोलापूर न्यायकक्षेच्या अधिन राहुन करण्यात येईल.

२०. वरील दरपत्रकासंदर्भात काही शंका/अडचण असल्यास विद्यापीठाच्या ०२१७-२७४४७७०-७४ (Ext.१७३) या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

२१. वरील सुचना व अटी मान्य आहेत.

पुरवठादाराची स्वाक्षरी व सही

# दरपत्रक

(दरपत्रक फर्मच्या लेटर हेडवर सादर करावे (To be printed on letter Head ) )

प्रति,
मा.वित्त व लेखा अधिकारी,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय:-** प्रस्तुत विद्यापीठातील शास्त्रीय उपकरण केंद्र, रसायनशास्त्र संकुल व पदार्थविज्ञान संकुलांमधील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिके व संशोधनाकरीता लागणारा गॅस वार्षिक दरकरारामधुन खरेदी करण्याकरिता दरपत्रके मागविण्याबाबत...

महोदय,

वरील विषयांकित साहित्य आम्ही खालील नमूद दराप्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहोत.

<u>अंदाजपत्रक [SCHEDULE – B]</u>

<u>{दरपत्रक हे फर्मच्या लेटर हेडवर द्यावे}</u>

| अ. क्र. | तपशील | नग | प्रति नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1. | Liquid Nitrogen | 1 Cylinder- 52 Ltr | | |
| 2. | UHP Nitrogen Gas Cylinder | Per Cylinder | | |
| 3. | UHP Helium Gas Cylinder (for GCMS) | Per Cylinder | | |
| 4. | UHP Nitrus Oxide Cylinder (for AAS) | Per Cylinder | | |
| | | | GST -----% | |
| | | | Total Amount With GST | |

उपरोक्त दराप्रमाणे मी/आम्ही काम करण्यास तयार आहोत.

स्वाक्षरी :-

पुरवठाधारकाचे नाव :- शिक्का

शिक्का :-

दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक